निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : २८० वा.
रविवार :१४ डिसेंबर २०२५

मुख्य संपादक- सुग्रीव मुंडे | E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247





## भूषण गवई राजकारणात प्रवेश करणार?

**माजी सरन्यायाधीश स्पष्टपणे म्हणाले, 'नियतीच्या मनात...'**

**आत्ताच एक्सप्रेस**

**नागपूर/ प्रतिनिधी/** सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशपदावरुन निवृत्त झाल्यानंतर आणि ६ महिन्याच्या कार्यकाळानंतर भूषण गवई राजकारणात प्रवेश करणार का? अशी चर्चा सातत्याने होताना दिसते. या प्रश्नावर माजी सरन्यायाधीशांनी झी २४ तासच्या टु द पॉइंट कार्यक्रमात थेट उत्तर दिलं आहे. झी २४ तासचे संपादक कमलेश सुतार यांनी आम्ही तुम्हाला कधी राजकारणात येताना बघू का? असा प्रश्न विचारला होता. तेव्हा गवई यांनी या प्रश्नाचे थेट उत्तर देत चर्चेला पूर्णविराम दिला आहे.

भूषण गवई यांच्या वडिलांची मोठी राजकीय कारकिर्द होती. बंधू राजकारणात असून आईदेखील सामाजिक कार्यात कार्यरत आहेत. त्यामुळं सरन्यायाधीशपदावरुन निवृत्त झाल्यानंतर गवई राजकारणात दिसणार का? असा प्रश्न त्यांना टु द पॉइंट कार्यक्रमात केला होता. त्यावर त्यांनी स्पष्टपणे उत्तर दिलं आहे, 'राजकारणात येण्याचा सध्या कोणताही विचार नाहीये, पण सामाजिक कार्य करण्याची इच्छा राहिलंच, असं उत्तर त्यांनी दिलं आहे. तसंच, ते पुढे म्हणाले की, 'राजकारणात येण्याचा माझ्या डोक्यात तसा विचार नाही. पण स्पष्टपणे नाही म्हटलं आणि काही वर्षात नियतीच्या मनात काय असते आपण सांगू शकत नाही.' 'ज्यावेळेला मी अमरावतीत सामान्य कुटुंबात जन्म घेतला. शिक्षणाच्या सुरुवातीला पालिकेच्या शाळेत होतो. सुरुवातीला आम्हाला ताडपत्रीवर बसायला लागायचे. तेव्हा विचारही केला नव्हता की मला देशाचे सरन्यायाधीश होता येईल. त्यामुळं नियतीच्या मनात काय असेल सांगू शकत नाही,' असं भूषण गवई यांनी म्हटलं आहे.

**जातीयवादाचा सामना करावा लागला का?**

'मी स्पष्टपणे सांगू इच्छितो की वडील राजकारणात आल्यावर आम्ही मुंबईला आलो. त्यानंतर माध्यमिक शाळेत शिकत असताना किंवा महाविद्यालयात शिकत असतानाही मला कोणत्याही प्रकारे या समाजाचे आहोत किंवा शेड्युल कास्टचे आहेत म्हणून दुजाभाव केला जातोय, असा अनुभव कधीच आला नाही. नोकरीच्या ठिकाणीही वकिली करताना असा अनुभव आला नाही.'

# कृषी क्षेत्र व प्रक्रिया उद्योगांची बृहद जोडणी करणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**आत्ताच एक्सप्रेस**

**नागपूर /प्रतिनिधी/**कृषी क्षेत्राच्या विकासासाठी शेतकऱ्यांचा क्षमता विकास करून प्रक्रिया उद्योगासह इतर संलग्न क्षेत्राशी त्याची बृहद जोडणी करण्यात येईल. यासाठी आवश्यक धोरण तयार करण्यात येईल व आवश्यक निधी राज्य शासनाकडून देण्यात येईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले.येथील सेंटर पॉईंट हॉटेलमध्ये कॉन्फेड्रेशन ऑफ इंडियन इंडस्ट्रीच्यावतीने (सीआयआय) 'भविष्याभिमुख महाराष्ट्रासाठी कृषी क्षेत्राचे कृषिउद्योगात रूपांतर : मूल्यवर्धन, नवोन्मेष व गुंतवणूक' विषयावर आयोजित फूड कॉनक्लेवचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी कृषी राज्यमंत्री ड. आशिष जयस्वाल, कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी, उद्योग विभागाचे सचिव डॉ. पी. अन्बलगन, सीआयआयचे अध्यक्ष बुर्जीस गोदरेज आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, वातावरणीय बदलांमुळे शेतीमध्ये झालेले बदल हे या क्षेत्रासमोरील मोठे आव्हान आहे. यासंदर्भात उचित उपाययोजना करण्यासाठी राज्य शासन सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे. कृषी क्षेत्रात मुल्यवर्धन करून शेतकऱ्यांना जास्तीत-जास्त फायदा होण्याच्या दिशेने शासनाचे प्रयत्न आहेत. यासोबतच अन्न प्रक्रिया उद्योगाशी या क्षेत्राला जोडण्याचे कार्यही सुरू आहे. परिणामी शेतकऱ्यांना चांगला मोबदला मिळत आहे. कृषी संबंधित उर्वरित क्षेत्रामध्ये प्रक्रिया पद्धती रूजवून उचित परिसंस्था उभारण्याच्या दिशेनेही प्रयत्न सुरू आहेत.

### फूड कॉनक्लेवचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

जागतिक बँकेच्या मदतीने राज्यात 'स्मार्ट' आणि 'मॅग्नेट' या महत्वाकांक्षी प्रकल्पांची अंमलबजावणी सुरू आहे. देशात सर्वात जास्त शेतकरी उत्पादक संस्था (एफपीओ) असणाऱ्या महाराष्ट्र राज्यात या दोन्ही प्रकल्पांना केंद्र व राज्याच्या विविध योजनांद्वारे मदत करून कृषी क्षेत्र बळकट करण्यासाठी शासन कार्य करीत आहे. कृषी क्षेत्राच्या विकासासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा उपयोग करण्याचा प्रयत्न सुरू आहे. यासंदर्भात मागील वर्षी पुणे येथे कृषी हॅकेथॉनचे आयोजन करण्यात आले व त्यात विविध स्टार्टअपस्द्वारे शेती क्षेत्रातील अडचणी दूर करण्याबाबत नवोन्मेशी प्रयोग पुढे आल्याचे त्यांनी सांगितले.

कृषी क्षेत्रात क्षमता विकास आणि वित्त पुरवठा करण्यासाठी खाजगी क्षेत्राची मदत घेण्याबाबतही शासन विचार करीत आहे. या क्षेत्राच्या विकासासाठी शेतकऱ्यांचा क्षमता विकास करून प्रक्रिया उद्योगासह इतर संलग्न क्षेत्राशी त्याची बृहद जोडणी करण्याच्या दिशेने कार्य सुरू असून आवश्यक धोरण तयार करण्यात येईल व यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात येईल. नागपूर येथे




आयोजित या परिषदेत जे विषय पुढे येतील त्याला राज्यातील कृषी क्षेत्राच्या विकासाठी राज्य शासन मदत करेल, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले तर उद्योग विभागाचे सचिव डॉ. पी. अन्बलगन यांनी 'महाराष्ट्र द इकॉनॉमिक इंजिन पॉवरिंग विकसित भारत २०४७' विषयावर सादरीकरण केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते कृषी विभागाच्या माहिती पुस्तिकेचे विमोचन झाले. सीआयआयचे बुर्जीस गोदरेज यांनी स्वागतपर भाषण केले तर संस्थेचे फिरोज खंबाटा यांनी आभार मानले.

## लोकसभेचे माजी अध्यक्ष शिवराज पाटील चाकूरकर यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

आत्ताच एक्सप्रेस

लातूर/प्रतिनिधी/ जवळपास सहा दशके आपल्या सुसंकृत राजकारणाने जनसेवा करणारे लातूर जिल्ह्याचे सुपुत्र शिवराज पाटील चाकूरकर यांच्या पार्थिवावर आज वरवंटी (ता. लातूर) येथे शासकीय इतमामात, मंत्रोच्चारात अंत्यसंस्कार करण्यात आले. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला, केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री संजय सेठ, राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी यावेळी पुष्पचक्र अर्पण करून शिवराज पाटील चाकूरकर यांना श्रद्धांजली वाहिली. तसेच पोलीस दलाच्या जवानांनी यावेळी बंदुकीच्या फैरींची सलामी देऊन मानवंदना दिली.तत्पूर्वी सकाळी देवघर निवासस्थानी शिवराज पाटील यांच्या पार्थिवाला पोलीस दलातर्फे मानवंदना दिल्यानंतर अंत्ययात्रेला सुरुवात झाली.

# दीक्षाभूमी स्मारक विकासकामांचा मंत्री संजय शिरसाट यांच्याकडून आढावा


**आत्ताच एक्सप्रेस**

**नागपूर/ प्रतिनिधी/** दीक्षाभूमी जागतिक पातळीवरील श्रद्धास्थान असल्याने येथे होणाऱ्या सर्व कामांचे नियोजन अत्यंत संवेदनशीलतेने, शास्त्रीय पद्धतीने आणि स्तूपाला कोणत्याही प्रकारचा धक्का न लागता पूर्ण दक्षता घेऊन आणि मुख्यमंत्र्यांच्या पूर्वपरवानगीने करावीत, अशा सूचना सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे मंत्री संजय शिरसाट यांनी आज दिल्या.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक दीक्षाभूमी येथे सुरू असलेल्या आणि प्रस्तावित विकासकामांचा सविस्तर आढावा त्यांनी आज नियोजन भवन येथे घेतला. यावेळी सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, सुधार प्रन्यासचे सभापती संजय मिणा, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, समाजकल्याण आयुक्त दीपा मुधोळ-मुंडे, सहसचिव सो.ना.बागुल तसेच सामाजिक न्याय विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मंत्री शिरसाट यांनी सांगितले की, कोणतेही काम हाती घेण्यापूर्वी संबंधित तज्ज्ञ आणि हितधारकांशी सखोल चर्चा करून नियोजन करावे. दीक्षाभूमीतील सुशोभीकरण, सुविधा आणि पायाभूत विकासकामे ही जागतिक दर्जाची असावीत, जेणेकरून देश-विदेशातून येणाऱ्या अनुयायांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध होतील. दीक्षाभूमीच्या ऐतिहासिक, सामाजिक आणि सांस्कृतिक महत्त्वाला अनुसरून विकासकामे करताना परंपरा, श्रद्धा आणि संवेदनशीलतेचा आदर राखणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी दीक्षाभूमी परिसरातील विविध विकास कामांवर चर्चा करण्यात आली. यात प्रवेशद्वार क्रमांक १ व २, सार्वजनिक सुविधा, वाहनतळ व्यवस्था, संग्रहालय, ॲम्फी थिएटर, विस्तीर्ण



परिक्रमा मार्ग, बोधीवृक्ष परिसर, वॉच टॉवर, तसेच आवश्यक सेवा-सुविधांचा समावेश होता.बैठकीस प्रादेशिक उपायुक्त प्रसाद कुलकर्णी, सहआयुक्त सचिन ढोले, सहायक पोलीस आयुक्त रोशन पंडित, कार्यकारी अभियंता नरेश लभाने, संशोधन अधिकारी गणेश मरकड व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

# सेवा पुस्तक हा कर्मचाऱ्यांच्या सेवा काळाचा आरसा- जिल्हाधिकारी दिलीप स्वामी






**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)**

अधिकारी असो वा कर्मचारी त्याच्या सेवा कार्यकाळातील सर्व महत्त्वाच्या नोंदी या सेवापुस्तकात ठेवल्या जातात, त्यामुळे अद्यावत राखणे अत्यंत आवश्यक आहे. त्याबद्दल प्रत्येक कर्मचारी अधिकारी यांनी दक्ष असले पाहिजे. सेवा पुस्तक हा कर्मचाऱ्याच्या सेवा काळाचा आरसा असतो,असे प्रतिपादन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज येथे केले.

जिल्ह्यात दि.१९ ते २५ डिसेंबर या कालावधीत सुशासन सप्ताह राबविण्यात येणार आहे. या सप्ताहाच्या पूर्वतयारीचा टप्पा आजपासून सुरु करण्यात आला. त्यात आज सेवापुस्तक नोंदींचे अद्यावतीकरण करण्यात आले. सुशासन सप्ताहात सेवा वितरण सुधारण्यासाठी अर्जांचे निवारण, राज्य पोर्टलवरील सार्वजनिक तक्रारींचे निवारण, सीपी ग्राम्स पोर्टलवरील तक्रारींचे अनावरण, नागरिक सनदचे अद्यावतीकरण, पीजी पोर्टल तक्रारींचे निवारण, सर्वोत्तम प्रशासन पद्धतीचा अवलंब असे विविध टप्पे राबविण्यात येणार आहेत. त्याअंतर्गत आज जिल्ह्यात सेवापुस्तक नोंद अद्यावतीकरण राबविण्यात आले.

जिल्हाधिकारी कार्यालयात नियोजन सभागृहात या उपक्रमाचा प्रारंभ जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करुन करण्यात आला. अपर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकुणे, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रवीण फुलारी तसेच सर्व शाखांचे प्रमुख, आस्थापना विभागाचे कर्मचारी तसेच सर्व संबंधित कर्मचारी उपस्थित होते.

प्रत्येक कर्मचाऱ्याला आपले सेवापुस्तक देऊन त्यात तपासावयाच्या नोंदींची सुची देण्यात आली.

त्यानुसार अपूर्ण असलेल्या नोंदी तात्काळ संबंधित आस्थापना कारकुनाकडून अद्यावत करुन घेण्यात आल्या.जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, आपण सेवा करत असतांना दैनंदिन व्यापात आपल्या महत्त्वाचे दस्तऐवज असतांना सेवा पुस्तक याकडेच दुर्लक्ष होण्याची शक्यता असते. मग ज्यावेळी सेवानिवृत्तीची वेळ जवळ येते त्यावेळी सेवा पुस्तकातील त्रुटी पूर्ण करण्यासाठी धावाधाव होते.

त्याकरीता आपले आरोग्य आणि सेवा पुस्तक याबाबत नेहमी दक्ष असले पाहिजे. या अद्यावतीकरणानंतर सर्वांचे सेवापुस्तक हे ऑनलाईन उपलब्ध करण्यात येतील,असेही त्यांनी सांगितले.

१०७७ जणांचे सेवापुस्तक होणार अद्यावत

जिल्ह्यात मुख्यालयी आणि तालुकापातळीवर आज ही मोहीम राबविण्यात आली.

जिल्ह्यात अपर जिल्हाधिकारी एक, उपजिल्हाधिकारी १४, तहसिलदार १२, लेखाधिकारी २, लघुलेखक १ असे गट अ चे ३०, गट ब चे नायब तहसिलदार ४३, सहायक लेखाधिकारी १, उपलेखापाल १ असे ४६, गट ब अराजपत्रित लघुलेखक ५, गट क मधील अव्वल कारकून १७२, मंडळ अधिकारी ८५, महसूल सहायक १४४, तलाठी ४७३, वाहन चालक १४ असे एकून ८८८ आणि शिपाई १०८ असे एकूण १०७७ अधिकारी कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकाचे अद्यावतीकरण या अभियानात केले जाणार आहे, अशी माहिती निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते यांनी दिली.

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा 'सुयोग' येथे पत्रकारांशी संवाद





**आत्ताच एक्सप्रेस**

**नागपूर/ प्रतिनिधी/** उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज सुयोग निवासस्थान येथे भेट देऊन माध्यम प्रतिनिधींशी अनौपचारिक संवाद साधला. प्रारंभी शिबिरप्रमुख प्रवीण पुरो यांनी उपमुख्यमंत्री पवार यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. मंत्रालय विधिमंडळ वार्ताहर संघाचे अध्यक्ष दिलीप सपाटे, सह शिबिरप्रमुख खंडूराज गायकवाड, संचालक (माहिती) (वृत्त/ जनसंपर्क) गोविंद अहंकारी आदी यावेळी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री पवार यांनी यावेळी नागरिकांच्या हितासाठी विविध योजनांची होत असलेली अंमलबजावणी, शासनाचे निर्णय, प्रयत्न, विधीमंडळातील जुन्या आठवणी अशा अनेक विषयांवर माध्यम प्रतिनिधींशी मनमोकळा संवाद साधला.

सुयोग निवासस्थान इमारतीच्या सुधारणांच्या अनुषंगाने परिपूर्ण माहिती सादर करण्याचे निर्देश त्यांनी यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाला दिले. यावेळी विविध माध्यमांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# महाराष्ट्र वाल्मीकी गदिमा

मराठीतील श्रेष्ठ साहित्यिक, कवी, गीतकार, पटकथा लेखक ग. दि. माडगूळकर उर्फ ग. दि. मा. यांचा आज स्मृतिदिन. १ ऑक्टोबर १९१९ रोजी जन्मलेल्या गदिमांचे शिक्षण आटपाडी, कुंडल आणि औंध येथे झाले. गदिमा यांना लहानपणापासून लेखनाची आवड होती. जेष्ठ साहित्यिक वि. स. खांडेकर यांच्याकडे त्यांनी काहीकाळ लेखनिक म्हणून काम केले त्याचा त्यांना खूप फायदा झाला. वि स खांडेकर यांचे सर्व पुस्तके त्यांनी वाचून काढले. वि. स. खांडेकर यांच्याकडून प्रेरणा घेऊन त्यांनीही लिहिण्यास सुरवात केली. त्यांनी कथा आणि कविता यांचे विपुल लेखन केले. के. नारायण काळे यांचे सहाय्यक दिग्दर्शक म्हणून त्यांनी काही काळ काम केले. भक्त दामाजी आणि पहिला पाळणा या चित्रपटासाठी त्यांनी गीतलेखन केले. लोकशाहीर रामजोशी या गाजलेल्या चित्रपटासाठी त्यांनी गाणी लिहिली इतकेच नव्हे तर या चित्रपटाची कथा आणि संवादही त्यांनीच लिहिले. हा चित्रपट खूप लोकप्रिय झाला. या चित्रपटाला खूप लोकप्रियता मिळाल्याने कवी आणि लेखक म्हणून त्यांचे नाव सर्वदूर पोहचले. या चित्रपटात त्यांनी छोटीशी भूमिकाही केली होती. त्यानंतर त्यांनी अनेक चित्रपटांसाठी पटकथा आणि गाणी लिहिली. त्यांच्या चित्रपटाच्या कथा वैविध्यपूर्ण होत्या. संवादही सोपे पण प्रेक्षकांच्या मनाला भिडणारे होते. त्यांनी दीडशेहून अधिक चित्रपटासाठी कथालेखन केले. त्यांनी मराठी चित्रपटांसाठी लिहिलेले गीते चैत्रबन ह्या नावाने संग्रहित आहे, तसेच त्यांनी लिहिलेल्या काही चित्रकथा ही मराठी चित्रकथा या नावाने प्रकाशित झाल्या आहेत. गदिमांच्या कवितेवर ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, आदी संतांच्या कवितेप्रमाणेच पंडिती आणि शाहिरी कवितेचेही सखोल संस्कार झाले होते, ह्याचा प्रत्यय त्यांनी चित्रपटांसाठी लिहिलेल्या सुंदर घाटाच्या, परंतु प्रभावी गीतांतून येते. त्यांच्या कवितेतील अस्सल मराठमोळेपणामागेही हेच संस्कार दिसून येते. त्यांनी लोकगीते, समरगीते आणि बालगीतेही लिहिली. त्यांच्या गीतरामायणाने तर लोकप्रियतेचा उच्चांक गाठला. गीतरामायणाच्या कार्यक्रमाचे हजारो कार्यक्रम झाले अजूनही होत आहेत. गीतरामायण ऐकले नाही असा मराठी माणूस शोधूनही सापडणार नाही. लोकांना गीतरामायण इतके आवडले की लोकांनी त्यांना महाराष्ट्र वाल्मिकी ही पदवी दिली. ते कवी, लेखक तर होतेच पण उत्तम अभिनेतेही होते. पुढचं पाऊल, पेडगावचे शहाणे, लाखाची गोष्ट, वऱ्हाडी आणि वाजंत्री या चित्रपटात त्यांनी केलेल्या भूमिका संस्मरणीय ठरल्या. गदिमांनी केवळ मराठीतच नव्हे तर हिंदीतही आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले. त्यांच्या कथेवर आधारित २५ हिंदी चित्रपटाची निर्मिती झाली. दो आँखे बाराह हाथ, नवरंग, गुंज उठी शहनाई, तुफान और दिया, आदमी सडक का या गाजलेल्या हिंदी चित्रपटांची पटकथा त्यांनीच लिहिली.

गुरुदत्त यांचा प्यासा, राजेश खन्ना यांचा अवतार, अमिताभ बच्चन, राणी मुखर्जी यांचा ब्लॅक या चित्रपटांच्या मूळ कथाही गदिमा यांच्याच. चार दशकांहुन अधिक काळ रसिकांच्या मनावर राज्य केलेल्या गदिमांचा पद्मश्री पुरस्कार देऊन सरकारने गौरव केला. १९७३ साली यवतमाळ येथे झालेल्या मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. महाराष्ट्र राज्याच्या विधानपरिषदेचेही ते सदस्य होते. १४ डिसेंबर १९७७ रोजी गदिमांचे निधन झाले. गदिमांसारखी बहुमुखी प्रतिमा असलेले रत्न मराठी मातीत जन्माला आले हे महाराष्ट्राचे भाग्यच. आपल्या बहुमुखी प्रतिमेने मराठी साहित्याची त्यांनी जी सेवा केली त्यासाठी मराठी माणूस कायम त्यांचा ऋणी राहील. बहुमुखी प्रतिमा आणि अष्टपैलू व्यक्तिमत्वाच्या जोरावर रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या गदिमांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!.

# दिवंगत लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या जयंतीनिमित्त ४२ रक्तदात्यांनी केले रक्तदान



**आत्ताच एक्सप्रेस**

**केज / प्रतिनिधी**/ जीवन विकास शिक्षण मंडळ केज आयोजित स्वामी विवेकानंद विद्यामंदिर माध्यमिक विभाग केज या शाळेमध्ये दिवंगत लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या ७६ व्या जयंतीनिमित्त दि. १२ डिसेंबर २०२५ वार शुक्रवार रोजी एकूण ४२ रक्तदात्यांनी रक्तदान करून रक्तदान चळवळीवरील आपले प्रेम व्यक्त केले. याप्रसंगी कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून जीवन विकास शिक्षण मंडळ या संस्थेचे अध्यक्ष अंकुशरावजी इंगळे हे उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून रक्तपेढी वैज्ञानिक अधिकारी, उपजिल्हा रुग्णालय केज श्रीकृष्ण नागरगोजे उपस्थित होते. इतर मान्यवर उपस्थितीमध्ये संस्थेचे सचिव जी. बी. गदळे, मा. वि. चे मु. अ. शिवनंदा मुळे, प्रा. वि. चे मु. अ. वसंत शितोळे, स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूलचे मु. अ. गणेश कोकीळ, प्राचार्य शंकर भैरट, सेवानिवृत्त शिक्षक हनुमंत घाडगे आदी उपस्थित होते.

सदरील रक्तदान शिबिर हे मागील ३० वर्षापासून या शाळेमध्ये आयोजित केले जाते. यावर्षी सदरील शिबिराने ३१ व्या वर्षात पदार्पण केले आहे. मागील ७ वर्षापासून हे शासकीय शिबिर सुरू आहे. या शिबिराचा सर्वसामान्य याचकाला उपयोग होतो. रक्तदानाबद्दल रक्तदात्यामध्ये बरेच गैरसमज असतात परंतु रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे, वयाच्या १८ ते ५५ वर्षापर्यंत आपण रक्तदान करू शकतो, रक्तदान केल्याने बरेच आजार कमी होतात, रोगप्रतिकारशक्ती वाढते, वजन कमी होते तसेच ७२ तासांमध्ये दिलेले रक्त पुन्हा परत येते. दर ६ महिन्याला रक्तदान केले पाहिजे जेणेकरून याचकाचे प्राण वाचतील.

याप्रसंगी माजी विद्यार्थी डॉ. अशोक डोईफोडे, सहशिक्षक महादेव गिरी तसेच कैलास अंधारे हे या शिबिराचे पहिले रक्तदाते ठरले.

दैनिक
निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र
आत्ताच एक्सप्रेस

Name Change

I, have changed my name
Old Name
KHAN MOHD AYAN MOHD ASHRAFULLAH
New Name
AYAN KHAN ASHRAFULLA KHAN
AS PER AADHAR CARD

दैनिक
निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र
आत्ताच एक्सप्रेस

Name Change

I, have changed my name
Old Name
KHAN NAHEED ASHRAF KHAN
New Name
NAHEED KHAN ASHRAFULLA KHAN
AS PER AADHAR CARD

दैनिक
निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र
आत्ताच एक्सप्रेस

Name Change

I, have changed my name
Old Name
KHAN MOHD ASHRAFULLAH
New Name
ASHRAFULLA SANAULLA KHAN
AS PER AADHAR CARD

दैनिक
निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र
आत्ताच एक्सप्रेस

Name Change

I, have changed my name
Old Name
ASHRAF KHAN
New Name
ASHRAFULLA SANAULLA KHAN
AS PER AADHAR CARD

# हायर एज्युकेशन लीडर ऑफ द इयर २०२५ हा मानाचा पुरस्कार डॉ. देवेश पाथ्रीकर यांना प्रदान

**आत्ताच एक्सप्रेस**

**बदनापूर (प्रतिनिधी)** सिम्प्लीलर्न प्रायव्हेट लिमिटेड, बेंगळुरू व प्लस नाईन वन,नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित युनिव्हर्सिटी लीडर्स फोरम बाय सिम्प्लीलर्न या राष्ट्रीय स्तरावरील कार्यक्रमात हायर एज्युकेशन लीडर ऑफ द इयर २०२५ हा मानाचा पुरस्कार निर्मल क्रीडा व समाज प्रबोधन ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. देवेश दत्ताभाऊ पाथ्रीकर यांना प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार वितरण सोहळा फेअरफिल्ड बाय मॅरियट, पुणे येथे देशभरातून आलेल्या मान्यवर शिक्षणतज्ज्ञ, शिक्षणसंस्था प्रमुख व प्रशासकांच्या उपस्थितीत पार पडला. संस्थेचे अध्यक्ष म्हणून डॉ. देवेश पाथ्रीकर यांनी आपल्या दूरदृष्टीपूर्ण व अभ्यासपूर्ण नेतृत्वातून इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी ची यशस्वी स्थापना करून संस्थेला शैक्षणिक क्षेत्रात भक्कम स्थान मिळवून दिले आहे. गुणवत्तापूर्ण व रोजगाराभिमुख शिक्षण, अद्ययावत पायाभूत सुविधा, आधुनिक प्रयोगशाळा, डिजिटल शिक्षण पद्धती तसेच विद्यार्थी-केंद्रित उपक्रमांना त्यांनी विशेष प्राधान्य दिले.

त्यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेतील शैक्षणिक वातावरण अधिक सुदृढ होत असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळाली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना हा प्रतिष्ठित राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. याच कार्यक्रमात इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड



टेक्नॉलॉजीचे प्राचार्य डॉ. पंकज कडू यांनाही हायर एज्युकेशन लीडर ऑफ द इयर २०२५ या मानाच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. एक अनुभवी प्राचार्य म्हणून त्यांनी शैक्षणिक गुणवत्ता वाढ, अध्यापन पद्धतींमध्ये नवोपक्रम, शिक्षक व विद्यार्थ्यांमधील समन्वय तसेच शिस्तबद्ध शैक्षणिक व्यवस्थापन यावर भर देत महाविद्यालयाची प्रगती सातत्याने पुढे नेली आहे.

मराठवाडा विभागातून पहिल्यांदाच या प्रतिष्ठित राष्ट्रीय पुरस्काराचा मान मिळाल्याने शिक्षण क्षेत्रात आनंद व अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे. या दुहेरी सन्मानामुळे संस्थेच्या शैक्षणिक वाटचालीला नवी ऊर्जा मिळाली असून भविष्यात अधिक दर्जेदार, नावीन्यपूर्ण व समाजाभिमुख शिक्षण देण्याची प्रेरणा मिळाल्याची भावना यावेळी डॉ. पाथ्रीकर व डॉ. कडू यांनी व्यक्त केली.

पुरस्कार मिळाल्याबद्दल सर्व स्तरातील अभिनंदन होत आहे.

# सावधान, बिबट येत आहे ?

आज गावागावात बिबट्या येत आहे. शहरातही आज बिबट्या शिरला आहे व याची झळ नागपूरलाही पोहोचलेली आहे. लोकं अतिशय घाबरलेले असून ते दहशतीत आहेत. ते असा विचार करतात की आता पुरे झाले. एकतर बिबट्याचा बंदोबस्त लावावा किंवा बिबट्याच्या हत्येचे सुत्र आमच्याकडे द्यावे. जेणेकरुन आम्ही बिबट्याचा बंदोबस्त लावू शकू.बिबट, त्याला बिबट्या या नावानं ओळखलं जातं. हा जंगली प्राणी आहे व तो मांसभक्षक असल्यानं लोकांना अक्षरशः त्याची भीती वाटत आहे.बिबट्याच्या अधिवासाबाबत विचार करीत असतांना हा प्राणी कुठेही राहतो, अर्थात झाडावर, पाण्यात, जंगलात आणि आता ती गावातही वास्तव्याला राहतो. त्यातच आता तो शहरातही शिरायला लागलेला आहे.बिबट्याच्या खाद्याबाबत विचार करतांना त्याचं आवडतं खाद्य आहे, कुत्री, हरीण वा लहान ससे व आपल्या वजनापेक्षा लहान जनावरे. ज्यात लहान मुलांनाही तो क्षती पोहोचवीत असतो. तसं पाहिल्यास तो माणसांना खात नाही. अन् त्याचेपेक्षा मोठ्या असलेल्या जीवालाही तर अजिबात खात नाही. तसं पाहिल्यास भारतातील बिबट्याचं वजन हे वीस किलो असते तर आफ्रिकन बिबट्याचं वजन हे नव्वद किलो असते.

भारतामध्ये शिकार करतांना तो रात्री अंधारातच शिकार करतो व शिकार करतांना पुढील भक्ष हा कसा व किती सामर्थ्यवान आहे. याचा अंदाज लावतो व मगच शिकार करतो. तसं पाहिल्यास तो अतिशय विचारी प्राणी नाही. मात्र इतर प्राण्यांच्या तुलनेत त्याची कवटी मोठी असते.

लोकं बिबट्याला घाबरतात. कारण तो अलिकडील काळात माणसांच्या वस्तीत शिरत असून माणसांवरही हल्ले करु लागलेला आहे. त्यातच माणसांची लहान लहान मुलं ही देखील खावू लागलेला आहे. ज्यातून लोकं घाबरतात. त्यातून असं वाटतं की हाच बिबट्या पुढील काळात माणसांनाही खायला मागंपुढं पाहणार नाही. तसा विचार केला तर...... अन् दुसरा विचार करुन त्याला माणसाळविण्याचा विचार केल्यास तोही प्राणी माणसांच्या वस्तीत राहू शकेल. ही शक्यता नाकारता येत नाही. त्यातच हा बिबट माणसांच्या वस्तीत ठेवून त्याला दूध, भात, पोळी दिली तर तो माणसाळविलाही जावू शकतो. ज्यातून त्याची आपणाला असलेली भीती दूर होवू शकते. परंतु ते आपण माणसाळविलेले नसल्याने व ते जंगली असल्याने आज आपल्याला बिबट्याची भीती वाटतेय. मात्र असं त्याला माणसाळविणं सहज शक्य गोष्ट नाही.

ती एक अशक्यप्राय गोष्ट आहे.

असेच काही बिबटे नागपूर शहरालगत असलेल्या पारडी क्षेत्रात मुक्कामी आहेत. त्यांनी फार मोठी भीती पसरवलेली असून सध्या लोकं फारच धास्तीत आहेत. त्यातच काही अनैतिक घटक बिबट्या अमूक ठिकाणी दिसला, असे म्हणून भीती पसरवीत असून आता पारडी भागातील रस्तेही रात्री सुनसान झालेले दिसतात. वाटतं की कधी बिबट्या आपल्याला आडवा येईल व कधी आपल्याला क्षती पोहोचवेल. बिबट्याची ही दहशत पाहता पारडी भागात गर्दीच्या ठिकाणी वसलेल्या इमारतीत शिरलेले दोन बिबटे पकडले. ते रात्रीच परीसरात शिरले असावे असा अंदाज होता. कारण ते दोन्ही बिबटे सकाळी सकाळी लोकांना परीसरात मुक्कामाला असलेले दिसले. त्यातच एका बिबट्यानं भीतीनं लोकांवरच हमला केला होता. ज्यात सात आठ लोकं जखमी झालेले होते. निश्चित आकडा सांगणं कठीण आहे. मात्र बिबट त्याच दिवशी पकडलेला असून तो एक भीतीच नाही तर हास्याचा विषय आणि चर्चेचा विषय ठरलेला आहे. काही लोकं बिबट्याबाबत, 'लांडगा आला रे' सारखं 'बिबट्या आला रे' असं म्हणत विनोद पसरवतात तर काही लोकं बिबट येवू नये म्हणून आतून दाराची कडी लावून बसतात. दारं, खिडक्या बंद करतात. त्यातच एक मुलगी चर्चा करतांना म्हणत होती की बिबट्या हा दरवाजाही ठोकतो माणसासारखा. असं म्हटल्यावर हशा पिकला. परंतु असं जर घडत असेल तर ही बाब विचारात घेण्यालायक बाब असून विचार करायला लावणारी बाब आहे.

बिबट जंगलात राहतो व मांजरीच्या वंशातील प्राणी शोभतो. काही देशात बिबट्याला लहानपणापासूनच पोषतात. तो त्याचा स्वभाव पाहून. त्याला जर कुत्र्यासारखं लहानपणापासूनच घरी पोषलं व खायला प्यायला मांस न देता दूध, भात, पोळी दिलं तर तो त्याच्या अंगात असलेला मूळ स्वभाव विसरुन जावू शकतो.

कारण ज्यावेळेस माणसानं कुत्रं पोषणं सुरु केलं. त्यावेळेस तोही जंगलीच प्राणी होता. परंतु आता तो संपुर्णतः गावातच राहात असून माणसाळवलाय. तसंच मांजरीचंही आहे. मांजरीचाही समावेश पुर्वी जंगली प्राण्यातच होत होता.

परंतु आता लोकं मांजरीलाही पाळायला लागल्यानं व तिला मांस न देता दूध, भात देत असल्यानं ती आता दूधच पिते व भात खाते. त्यातच पोळीही खाते व ती माणसाच्या घरी राहते. तसं पाहिल्यास काही मांजरी या माणसांवरही हल्ला करतातच. परंतु तरीही आपण मांजर पोषतोच. आज प्रत्येक घरात मांजर व कुत्रा हे एकमेकांचे पक्के शत्रू असतांना बऱ्याच घरात ते एकत्र राहतात. ही वास्तविकता आहे. आज सापासारखे विषारी असणारे प्राणीही काही लोकं पाळतात. त्यातच त्यांचा वापर मनोरंजन म्हणूनच नाही तर पैसे कमविण्यासाठी करतात. काही ठिकाणी सापाची उद्यानेही आहेत. सर्वसामान्य माणूस मात्र सापांना भीतो. कारण त्याचा असलेला स्वभावगुण. जर त्याच्या शेपटीवर पाय पडलाच तर तो चावतो व त्यातून माणूस मरतो. ही आपल्यात असलेली भावना. तरीही जनजागृती होतच असते की साप हा शेतातील उंदरं खातो. किडे खातो. जे किडे वा उंदरं शेतातील पिकांचं नुकसान करतात. आपण हत्तीसारख्या अजस्र प्राण्यांवरही विजय मिळवला व त्याला माणसाळवलंय. तसंच आपण बिबट्या पाळायचा विचार करणं का योग्य नाही? जर त्याच्या पाडसांना लहानपणापासूनच माणसांसारखी वागणूक दिली तर तो आपल्याच शेतातील पीकं नष्ट करणाऱ्या जंगली प्राण्यांपासून अर्थातच रानडुकर वा रानगाईपासून आपल्या पिकांचं नुकसान थांबवेल. कारण बिबट्या हा आपल्यापेक्षा वजनाच्या वरच्या घटकांची शिकार करीत नसला तरी सर्वच प्राणीमात्रा त्याला घाबरतात. परंतु आपण त्याला घाबरतो. कारण आपल्या मनात भीती आहे की तो जंगली प्राणी आहे. तो आपल्याला खाणारच. म्हटलं जातं की अस्तीनचा साप पाळू नये. कारण अस्तीनचा साप हा केव्हा आपला घात करेल. हे सांगता येत नाही. तसं आज आपल्याला बिबट्याबाबत वाटत आहे.

आज बिबट भारतात माणसांच्या वस्तीत शिरलेला आहे. बऱ्याच गावातून बिबट दिसला, बिबट दिसला, अशी आरडाओरड होते. कारण बिबट्याचं माणसाच्या वस्तीत वावरणं. कोणी म्हणत आहेत की वनविभागच बिबट्याला माणसाच्या वस्तीत सोडत असावं. कोणी म्हणत आहेत की भाजपानं अधिवेशनात आंदोलनाला लोकं येवू नये म्हणून बिबट्या आणलाय. परंतु ते लोकांचं म्हणणं आहे. जेवढे व्यक्ती तेवढे विचार. असं म्हणणं बरोबर नाही. कारण बिबट्या व अधिवेशन, याचा दूरदूरपर्यंत संबंध नाही आणि वनविभागही अशी हरकत करु शकत नाही. मात्र बिबट्याचं मानवी वस्तीत दिसणं, हा संकेत आज असं दाखवत आहे की भविष्यात बिबट्या हा भारतात माणसांच्या वस्तीतच राहील. दूध, भात वा माणसं खात असलेलंच अन्न तोही आनंदानं खाईल. त्यातच काही देशांमध्ये जसे बिबट्याला पोषलं जातं. तसंच भारतातही त्याला पोषलं जाईल.

साधारणतः बिबट्याला सर्व लोकं घाबरतात. त्याचं कारण आहे, आपल्यात असलेला त्याच्याबाबतीतील गैरसमज आणि त्याचं जंगलात राहाणं. तसा तो एक जंगली प्राणीच आहे.बिबट्या हा शक्यतोवर सहजासहजी आपल्यावर हमला करीत नाही. तसा तो समूहातही हल्ला करीत नाही. तो मार्जार कुळातील प्राणी आहे. कारण बिबट्या म्हणजे काही चिता नाही. चिता वेगळा व बिबट्या वेगळा. बिबट्याच्या शिकारीच्या बाबत विचार केल्यास त्याला शिकार करणे पाहिजे त्याप्रमाणात जमत नाही. परंतु असं असलं तरी आज बिबट नागपूरात वा गाव, शहरालगत दिसणं चिंतेची बाब आहे.

महत्वपुर्ण बाब ही की बिबट्या दिसणं ही सहज प्रवृत्ती आहे. ती नैसर्गिक बाब आहे. परंतु त्याचा बंदोबस्त करणं ही काही नैसर्गिक प्रवृत्ती नाही. बिबट्याचा बंदोबस्त केल्यास तो नक्कीच कमी होवू शकतो. जर सरकारनं बिबट्याची हत्या करण्यासाठी जनतेला खुली सुट दिली तर...... जसं शिवाजी महाराज लहान असतांना व जिजाबाई पुण्याला वास्तव्याला असतांना जे मोकाट लांडगे सुटले होते. लोकं दहशतीत होते.

त्यावेळेस त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी माता जिजाबाईनं लांडगे मारण्याची खुली सुट दिली होती. तसेच काही ठिकाणी बक्षीसही ठेवले होते. आज लोकं बिबटच नाही तर त्यांच्यापेक्षा अजस्र प्राण्यांची शिकार करु शकतात. ते माजलेल्या हत्तीलाही काबूत करु शकतात. ते वेळीच बिबट्यांचाही बंदोबस्त लावू शकतात. परंतु ते लाचार आहे त्या नियमापुढं. पुढं एखादा बिबट मारलाच तर त्याच्या हत्येची केस आपल्यावरच लागेल व आपल्यालाच तुरुंगाची हवा खावी लागेल. असाच विचार करुन लोकं बिबट्याच्या वाट्याला जात नाहीत व बिबट्याला मारायला पाहात नाहीत. कदाचीत बिबट्या तर मरुन जाईल. परंतु आपलीच हानी होईल. असं लोकांचं मत.विशेष सांगायचं झाल्यास बिबट्याचा बंदोबस्त करता येतो आणि तो करायचा असेल तर पहिली बाब बिबट्या मारणे आवश्यक आहे.

तसा अध्यादेश सरकारनं काढावा. नाहीतर त्याला माणसाळविण्यासाठी उपाय काढावेत. हत्तीसारख्या प्राण्यांना माणसाळविलं तसं. जेणेकरुन माणसांच्या वस्तीत आलेल्या बिबट्यांचा बंदोबस्त करता येईल. अन् असं जर झालं नाही तर उद्या तो दिवस दूर नाही की ज्या वेळेस बिबट्याचे गावात व शहरात राज्य निर्माण होईल. त्यातच मानववस्ती नष्ट होईल. ही शक्यता नाकारता येत नाही.

**-अंकुश शिंगाडे नागपूर**

# संक्षिप्त

## सोशल मीडियावर एआय पद्धारे बनावट फोटो व्हायरल; पिशोर परिसरात नागरिकांमध्ये घबराट

**आत्ताच एक्सप्रेस**
**कन्नड ग्रामीण प्रतिनिधी / सुनील निकम/** कन्नड तालुक्यातील पिशोर येथे मागील बुधवार (दि. १०) पासून गिरजा माता मंदिर देवमाळ परिसरात बिबट्याचे दर्शन झाल्याची चर्चा सुरू होती. काही महिलांनी बिबट्या पाहिल्याचा दावा केल्यानंतर, शुक्रवारी पिशोर नाका-सिल्लोड रोड परिसरात बिबट्या असल्याचा एक फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाला. या पार्श्वभूमीवर पिशोर येथील काही उपद्रवी तरुणांनी मोबाईलमधील एआय (-ख) फोटो



बनविणाऱ्या पचा वापर करून बिबट्या, सिंह, हत्ती यांसारख्या हिंस्र प्राण्यांचे बनावट फोटो तयार केले. हे फोटो व्हॉट्सॲप, इन्स्टाग्राम, फेसबुक तसेच स्टेटसद्वारे मोठ्या प्रमाणात प्रसारित करण्यात आले. त्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या खोडसाळपणामुळे अनेक नागरिक भयभीत झाले असून, सध्या शेती पिकांना पाणी भरण्याचे काम मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. विद्युत महामंडळाकडून रात्री वीजपुरवठा बंद ठेवून दिवसा वीज द्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांमधून होत आहे. यासंदर्भात पिशोर पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक शिवाजी नागवे यांनी सांगितले की, सोशल मीडियावर व्हायरल होणारे फोटो किंवा संदेश खरे आहेत की नाही, याची खात्री केल्याशिवाय नागरिकांनी त्यावर विश्वास ठेवू नये. यापुढे कोणीही अशा प्रकारचे खोटे, बनावट किंवा दिशाभूल करणारे फोटो सोशल मीडियावर शेअर केल्यास संबंधित व्यक्तींविरोधात कायदेशीर कारवाई करून गुन्हा दाखल करण्यात येईल. तसेच नागरिकांनी कोणताही फोटो किंवा मेसेज खात्री केल्याशिवाय सोशल मीडियावर शेअर करू नये, असे आवाहनही पोलिसांनी केले आहे.

## कन्नड शहर पोलीस दलाची कर्तव्यदक्ष कामगिरी; सायबर फसवणुकीतील रक्कम तक्रारदारास मिळवून दिली परत

**आत्ताच एक्सप्रेस**
**कन्नड प्रतिनिधी /** कन्नड शहर पोलीस दलाने सायबर फसवणुकीच्या प्रकरणात दाखवलेल्या तत्परता, दक्षता आणि कार्यक्षमतेमुळे एका नागरिकाची फसवणूक झालेली रक्कम अल्पावधीतच परत




मिळवून देण्यात यश मिळवले आहे. या उल्लेखनीय कामगिरीमुळे कन्नड शहरात पोलीस दलाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

कन्नड येथील रहिवासी अशोक येवले यांची अलीकडे सायबर फसवणूक झाली होती. त्यांच्या आय.सी.आय.सी.आय. बँकेतील खात्यातून ७,८०० रुपये परस्परपणे अन्य खात्यात वर्ग करण्यात आले होते. ही बाब लक्षात येताच अशोक येवले यांनी तात्काळ कन्नड शहर पोलीस दलाकडे धाव घेत तक्रार दाखल केली. तक्रार प्राप्त होताच कन्नड शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रघुनाथ सानप यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक कुणाल सूर्यवंशी यांनी या प्रकरणाची सूत्रे आपल्या हाती घेतली. कोणताही वेळ न दवडता त्यांनी तांत्रिक तपास सुरू केला. चौकशीत सदर रक्कम ही तक्रारदाराच्या खात्यातून अन्य खात्यात वर्ग झाल्याची खात्री झाली. तत्काळ सायबर पोर्टलवर तक्रार क्रमांक ३१९०९२ / ५०१७८१९३ नोंदवून संबंधित बँक खात्यांबाबत माहिती घेण्यात आली. तपासादरम्यान सदरची रक्कम 'होल्ड' स्थितीत असल्याचे समजताच सहाय्यक पोलीस निरीक्षक सूर्यवंशी यांनी आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केली. त्यानंतर मा. न्यायालयाकडून आदेश प्राप्त करून संबंधित रक्कम तक्रारदार अशोक येवले यांना परत मिळवून देण्यात आली. या संपूर्ण कारवाईदरम्यान पोलीस निरीक्षक रघुनाथ सानप, सहाय्यक पोलीस निरीक्षक कुणाल सूर्यवंशी, पोलीस शिपाई विजय चौधरी तसेच महिला पोलीस शिपाई श्रीमती मंगला ठाकरे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. संघभावना आणि समन्वयातून केलेल्या या धडक कारवाईमुळे सायबर फसवणुकीच्या प्रकरणात नागरिकांना दिलासा मिळाला आहे. या यशस्वी व तत्पर कारवाईबद्दल कन्नड शहरातील नागरिकांमध्ये पोलीस दलाबाबत विश्वास अधिक दृढ झाला असून सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन केले जात आहे. यावेळी पोलीस दलाने नागरिकांना आवाहन केले आहे की, अनोळखी फोन कॉल, संदेश, लिंक, ओटीपी अथवा बँकविषयक माहिती कोणालाही देऊ नये , तसेच कोणतीही संशयास्पद बाब आढळल्यास तात्काळ पोलीस ठाणे किंवा सायबर हेल्पलाईनवर संपर्क साधावा. सायबर गुन्ह्यांच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर कन्नड शहर पोलीस दलाने दाखवलेली ही कर्तव्यदक्ष आणि संवेदनशील भूमिका निश्चितच अनुकरणीय असून, नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी पोलीस दल सदैव तत्पर असल्याचा विश्वास या घटनेतून अधोरेखित झाला आहे.

## उमेश रायभान मोरे यांचे दुःखद निधन....

**आत्ताच एक्सप्रेस**
**गंगापूर प्रतिनिधी /** गंगापूर तालुक्यातील लासूर स्टेशन येथील समर्थ बॅटरीचे संचालक उमेश रायभान मोरे (रा.लासूर स्टेशन वय.४४ वर्ष)यांचे शुक्रवारी मध्यरात्री दुःखद निधन झाले त्यांच्या प्रार्थिवावर लासूर स्टेशन येथील स्मशानभूमीत शनिवारी सायंकाळी सहा वाजेसुमारास अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चयात आई,वडील,पत्नी,एक,मुलगा,भाऊ,भाऊजयी,पुतण्या,विवाहीत बहीण असा मोठा परिवार असून उमेश हे मनमिळाऊ स्वभावाचे असल्याने हजारो लोकांचा जनसमुदाय अंत्यविधीला उपस्थित होता...



# प्रतिष्ठान पुस्तक प्रकाशनाचा दिमाखदार सोहळा थाटात संपन्न



**आत्ताच एक्सप्रेस**
**पैठण प्रतिनिधी / बबन उदावंत/** प्रतिष्ठान म्हणजेच आजचे पैठण हे केवळ एक ऐतिहासिक शहर नसून प्रत्येक युगात समाजाला दिशा देणारे, विचारांना चालना देणारे आणि संस्कृतीला समृद्ध करणारे केंद्र राहिले आहे. भारतीय उपखंडातील एका बलाढ्य साम्राज्याची राजधानी म्हणूनही प्रतिष्ठानचे स्थान अनन्यसाधारण आहे, असे मौलिक विचार प्रसिद्ध साहित्यिक, कादंबरीकार व अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष श्री. विश्वास पाटील यांनी व्यक्त केले. जयवंत पाटील लिखित *'प्रतिष्ठान'* या बृहत ग्रंथाच्या भव्य प्रकाशन सोहळ्यात ते बोलत होते.

या प्रसंगी ज्येष्ठ कवी व लेखक श्री. अशोक बागवे यांनी पैठण नगरीच्या ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि साहित्यिक वैभवाचा सखोल आढावा घेतला. पैठण ही केवळ भौगोलिक ओळख नसून ती महाराष्ट्राच्या सांस्कृतिक स्मृतीचा अविभाज्य भाग आहे. येथील संतपरंपरा, व्यापार, कला, वस्त्रोद्योग आणि साहित्य यांनी महाराष्ट्राच्या जडणघडणीत मोलाची भूमिका बजावली आहे, असे ते म्हणाले.

कवी कुसुमाग्रज सार्वजनिक वाचनालय संस्था आणि यशवंतराव चव्हाण सेंटर, नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमात *'प्रतिष्ठान'* या ग्रंथाचे अत्यंत दिमाखदार पद्धतीने प्रकाशन करण्यात आले. स्टर्लिंग कॉलेज, नेरुळ (नवी मुंबई) येथील भव्य सभागृहात पार पडलेल्या या सोहळ्यासाठी साहित्यप्रेमी, अभ्यासक, इतिहास संशोधक आणि रसिकांची अलोट गर्दी उसळली होती. या ग्रंथाविषयी बोलताना अशोक बागवे म्हणाले, हे पुस्तक केवळ वाचण्यासाठी नाही, तर अभ्यासण्यासाठी आहे. तो एक महान ग्रंथ असून येणाऱ्या पिढ्यांना इतिहास, संस्कृती आणि मूल्यांची ओळख करून देणारा दीपस्तंभ ठरेल. त्यांनी लेखक जयवंत पाटील यांच्या अभ्यासपूर्ण लेखनाचे विशेष कौतुक केले.

लेखक जयवंत पाटील यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, पैठणचे ज्येष्ठ इतिहास संशोधक व स्वातंत्र्यसैनिक कैलासवासी बाळासाहेब पाटील यांच्या प्रेरणेतून हा ग्रंथ सिद्ध झाला. दोन वर्षांच्या अथक संशोधन, संदर्भ अभ्यास आणि क्षेत्रभेटीतून *'प्रतिष्ठान'* हा ग्रंथ साकार झाला आहे. यात केवळ पैठणच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्राच्या इतिहासाचा उगम, त्याची वाटचाल आणि सांस्कृतिक परंपरा मांडण्याचा प्रयत्न केला आहे, असे त्यांनी नमूद केले.

या ग्रंथात प्रतिष्ठानची प्राचीन राजधानी म्हणून असलेली ओळख, सातवाहन काळ, व्यापार व वस्त्रोद्योग, संतसाहित्याची परंपरा, धार्मिक व सामाजिक चळवळी, तसेच आधुनिक काळातील पैठणचा विकास यांचा सविस्तर समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे इतिहासप्रेमी, विद्यार्थी, संशोधक आणि सामान्य वाचकांसाठी हा ग्रंथ एक महत्त्वाचा संदर्भग्रंथ ठरणार आहे.

कार्यक्रमात ललित पाठक, प्रवीण पाटील, डॉ. अनिल पाटील यांच्यासह अनेक मान्यवर, साहित्यिक, शिक्षणतज्ज्ञ आणि सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. संपूर्ण सोहळा अत्यंत शिस्तबद्ध, विचारप्रवर्तक आणि रसिकांना तृप्त करणारा ठरला. वक्त्यांच्या ओघवत्या भाषणांनी आणि विषयाच्या गांभीर्याने उपस्थितांच्या कानांना आणि मनाला समाधान मिळाले.

एकूणच 'प्रतिष्ठान' ग्रंथाचा प्रकाशन सोहळा हा केवळ पुस्तक प्रकाशनाचा कार्यक्रम न राहता पैठणच्या गौरवशाली इतिहासाचे, महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशाचे आणि साहित्यिक परंपरेचे उत्सवस्वरूप दर्शन घडवणारा अविस्मरणीय सोहळा ठरला.

## रामनगर-पळशी पूर्ववसित गावाच्या प्रलंबित प्रश्नांमुळे जलसमाधीचा इशारा - प्रशासनाविरोधात विस्थापितांचा संताप शिगेला



**आत्ताच एक्सप्रेस**
**कन्नड ग्रामीण प्रतिनिधी / सुनील निकम/** कन्नड तालुक्यातील अंजना-पळशी धरणाच्या उभारणीमुळे विस्थापित झालेल्या रामनगर-पळशी पूर्ववसित गावातील नागरिकांचे मूलभूत प्रश्न गेल्या तब्बल पंचवीस वर्षांपासून प्रलंबित असल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण झाली आहे. पुनर्वसनाच्या नावाखाली दिलेल्या आश्वासनांची अद्याप अंमलबजावणी न झाल्यामुळे आता ग्रामस्थांनी थेट आंदोलनाचा पवित्रा घेतला असून, येत्या सोमवारी अंजना-पळशी धरणात जलसमाधी आंदोलन करण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते व ग्रामस्थ नेते कारभारी खुर्द रामनगर यांनी दिला आहे.

अंजना-पळशी धरणामुळे रामनगर-पळशी हे मूळ गाव पूर्णतः जलमय होऊन बाधित झाले. त्यानंतर शासनाकडून पुनर्वसनाच्या नावाखाली गावाचे पूर्ववसन करण्यात आले. मात्र, या पूर्ववसित गावात शासनाने ज्या मूलभूत सोयीसुविधा देण्याचे लेखी व तोंडी आश्वासन दिले होते, त्या आजतागायत प्रत्यक्षात उतरलेल्या नाहीत, असा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. पुनर्वसन आराखड्यानुसार प्रत्येक कुटुंबाला ठरावीक क्षेत्र उपलब्ध करून देण्यात येणार होते. मात्र, कागदोपत्री एकरावर काम पूर्ण झाल्याचे दाखवले जात असले तरी प्रत्यक्षात नागरिकांना तेवढे क्षेत्र उपलब्ध नसल्याचे गंभीर वास्तव समोर आले आहे. पूर्ववसित रामनगर-पळशी गावात आजही स्मशानभूमी व दफनभूमीची सोय नसल्याने ग्रामस्थांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. अंतर्गत रस्त्यांची दुरवस्था झालेली असून अनेक ठिकाणी रस्तेच नसल्यामुळे पावसाळ्यात गावातील दळणवळण पूर्णतः ठप्प होते. पथदिव्यांचा अभाव असल्याने रात्रीच्या वेळी नागरिकांना अंधारात वावरावे लागते, तर नाल्यांची व्यवस्था नसल्यामुळे पावसाचे पाणी घरांमध्ये शिरते. स्वच्छता, पाणीपुरवठा, वीज, सार्वजनिक सुविधा यांसारख्या मूलभूत बाबी अजूनही अपूर्ण असल्याने ग्रामस्थांचे जीवन अत्यंत हालअपेष्टांचे झाले आहे.

या सर्व प्रश्नांबाबत ग्रामस्थांनी गेल्या अनेक वर्षांत वेळोवेळी आंदोलने, निवेदने, मोर्चे काढून प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. मात्र, प्रत्येक वेळी केवळ आश्वासनांचे गाजर दाखवण्यात आले आणि प्रत्यक्षात कोणतीही ठोस कार्यवाही झाली नाही, अशी नाराजी ग्रामस्थांनी व्यक्त केली. महसूल विभाग, सिंचन विभाग, पंचायत समिती, उपविभागीय अधिकारी, तसेच लोकप्रतिनिधींनी या प्रश्नांकडे दुर्लक्ष केल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला आहे.

या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते कारभारी खुर्द रामनगर यांनी पंचायत समिती कन्नड येथील गट विकास अधिकाऱ्यांना लेखी निवेदन देत जलसमाधी आंदोलनाचा निर्णय जाहीर केला आहे. त्यांनी आपल्या निवेदनात स्पष्ट शब्दांत म्हटले आहे की, महसूल, सिंचन विभाग, आमदार, खासदार व पालकमंत्री यांनी केवळ कागदी घोडे नाचवले असून प्रत्यक्षात विस्थापितांना न्याय मिळालेला नाही. पंचवीस वर्षांपासून सुरू असलेला हा अन्याय आता सहनशक्तीच्या पलीकडे गेला आहे. प्रशासनाला जाग आणण्यासाठी जलसमाधी आंदोलनाशिवाय आमच्याकडे दुसरा कोणताही पर्याय उरलेला नाही, असा ठाम इशाराही त्यांनी दिला आहे. या जलसमाधी आंदोलनाच्या इशाऱ्यामुळे संपूर्ण परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले आहे. कोणत्याही अनुचित प्रकारास आळा बसावा यासाठी प्रशासनाने वेळीच हस्तक्षेप करून ग्रामस्थांच्या मागण्या गांभीर्याने ऐकाव्यात, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. आता प्रशासन या गंभीर प्रश्नांवर काय भूमिका घेते, विस्थापितांच्या न्यायासाठी कोणती ठोस पावले उचलते, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## भास्कर शेळके यांचे निधन

**आत्ताच एक्सप्रेस**
**वैजापूर प्रतिनिधी /** शहरातील पाटील गल्लीतील रहिवासी ज्येष्ठ नागरिक भास्कर दत्तात्रय शेळके वय (७१) यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने शुक्रवारी रात्री दहा



वाजता दुःखद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर शनिवारी सकाळी अकरा वाजता वैजापूर येथील अमरधाम मध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, दोन मुली, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे. भाजपचे सचिन वाणी तसेच ज्ञानदेव शेळके यांनी यावेळी श्रद्धांजली अर्पण केली.

# गंगापूर प्रभाग क्रमांक ५ मध्ये फुटलेल्या जलवाहिणीचे कामाला वेग - नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण

गंगापूर प्रभाग क्रमांक ५ मध्ये फुटलेल्या जलवाहिणीच्या दुरुस्तीच्या कामाला अखेर गती मिळाल्याने परिसरातील नागरिकांमध्ये समाधान आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. गंगापूर शहरातील नगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक ५, जुना मांजरी रोड परिसरात सध्या सिमेंट काँक्रीट रस्त्याचे काम गेल्या अनेक दिवसांपासून सुरू आहे. मात्र, या कामादरम्यान जलवाहिनी फुटल्याने परिसरात पाणी गळती होत होती. त्यामुळे रस्त्याचे काम ठप्प पडले होतेच, शिवाय नागरिकांना पाणीपुरवठा आणि दैनंदिन वाहतुकीस मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता.

या समस्येबाबत परिसरातील नागरिकांनी अनेक वेळा संबंधित यंत्रणांकडे तक्रारी करूनही दखल घेतली जात नसल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण होते. अखेर ही बाब दैनिक 'आत्ताच एक्सप्रेस'मध्ये प्रसिद्ध करण्यात आली. दैनिकाचे गंगापूर प्रतिनिधी सुभान शहा यांनी या प्रश्नाची गांभीर्याने दखल घेत थेट नगरपालिकेचे मुख्याधिकारी संतोष आगळे यांची भेट घेऊन फुटलेल्या जलवाहिनीची तात्काळ दुरुस्ती करण्याची मागणी केली.



आत्ताच एक्सप्रेस
सिमेंट रस्त्याचे काम कासव गतीने सुरू परिसरातील नागरिकांची गैरसोय ठेकेदाराचा मनमानी कारभार
आत्ताच एक्सप्रेस गंगापूर/ सुभान शहा/ प्रतिनिधी/ गंगापूर शहरातील नगरपालिका अंतर्गत प्रभाग क्रमांक ५ जुना मांजरी रोड या परिसरात सिमेंट रस्त्याचे काम अत्यंत कासव गतीने सुरू असल्यामुळे या परिसरातील नागरिकांना या रस्त्यावरून ये जा करण्यासाठी मोठा त्रास सहन करावा लागत आहे. मागील एक महिन्यापासून या परिसरातील सिमेंट रस्त्याचे काम सुरू आहे. ठेकेदार याचा मनमानी कारभार असल्यामुळे हे काम होत नसल्याची चर्चा आहे. या कामाला मुहूर्त लागणार का? या कामाची सुरुवात कधी होणार असा प्रश्न या परिसरातील नागरिकांनी उपस्थित केला आहे. या परिसरातील ५ रस्त्याचे काम सुरू आहे. या रस्त्यावर खडी ...
9860753464

## दैनिक 'आत्ताच एक्सप्रेस' चा दणका!

मुख्याधिकारी संतोष आगळे यांनी या विषयाची गंभीरता ओळखून त्वरित संबंधित विभागाच्या कर्मचाऱ्यांना आदेश दिले. त्यांच्या सूचनेनुसार नगरपालिका प्रशासन आणि ठेकेदाराने तात्काळ काम सुरू करत फुटलेल्या जलवाहिनीच्या दुरुस्तीला वेग दिला. काही वेळातच दुरुस्तीचे काम सुरू झाल्याने पाण्याची गळती थांबली आणि ठप्प पडलेले सिमेंट रस्त्याचे काम पुन्हा सुरू करण्यात आले.

जलवाहिनीच्या दुरुस्तीमुळे परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून, रस्त्याचे काम पुन्हा सुरू झाल्याने वाहतुकीच्या अडचणीही कमी होणार आहेत. दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या या समस्येवर तोडगा निघाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. तसेच नागरिकांच्या समस्या वेळोवेळी शासन आणि प्रशासनाच्या निदर्शनास आणून देणाऱ्या दैनिक 'आत्ताच एक्सप्रेस' आणि त्यांचे प्रतिनिधी सुभान शहा यांचे नागरिकांनी विशेष अभिनंदन केले आहे.



दैनिक 'आत्ताच एक्सप्रेस'मध्ये ही बातमी प्रसिद्ध होताच नगरपालिका प्रशासन आणि संबंधित ठेकेदाराने तात्काळ दखल घेऊन कार्यवाही केल्यामुळे प्रसारमाध्यमांच्या प्रभावी भूमिकेचे पुन्हा एकदा प्रत्यंतर आले आहे.

नागरिकांच्या मूलभूत सोयी-सुविधांशी संबंधित प्रश्न मार्गी लागल्याने गंगापूर शहरातील प्रभाग क्रमांक ५ मधील नागरिकांमध्ये आनंदाचे व समाधानाचे वातावरण पाहायला मिळत आहे.

I have changed my name from
:: OLD N-ME ::
F-RH-T B-NO RIY-ZUDDIN
:: NEW N-ME ::
F-RH-T DEEB- MOHD -MJ-D P-SH-
-DDRESS : H.No. 6-13-169, Paithan Road, Near R.K. Bakery, Silk Mills Colony, -UR-NG-B-D-431001. (M.S.)

निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र
आत्ताच एक्सप्रेस






# आष्टी येथे स्वर्गीय गोपीनाथजी मुंढे साहेब यांची जयंती साजरी

**आत्ताच एक्सप्रेस**

**आष्टी /प्रतिनिधी** / परतूर तालुक्यातील आष्टी येथेली डॉ बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथे स्व:गोपीनाथरावजी मुंढे साहेब यांची जयंती मोठ्या उत्सव साजरी करण्यात आली. यावेळी स्वर्गीय लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले यावेळी उपस्थित आष्टी पोलीस स्टेशनचे पीआय अजित चाटे,कांदे साहेब, तुकाराम सोळंके, रामप्रसाद थोरात सर, सिद्धू सोळंके, भागवत कडपे,परमेश्वर केकान, अमोल जोशी, उमेश सोळंके, सिद्धू केकान,सत्तार मास्टर कुरेशी, सौंदर्य नाना, मोशन जमीनदार, प्रवीण चौरे, अजहर शेख, भगवान कांबळे,योगेश मोरे, सखाराम इंगळे,अजीम कुरेशी,गणेश वैद्य, छत्रपती थोरात, दादाराव चौरे, बिट्टू भैया थोरात,गौतम मस्के, रमेश नांगरे, बबन चौरे, अर्जुन भैया थोरात, शिवाजी डोळस, गौतम शेळके,हनुमंत वाघमारे, दत्ता केदार, विष्णू चौरे ,व अनेक नागरिकांची उपस्थिती होती.

# नैसर्गिक अनुदान घोटाळा : १.३० कोटींचा अपहार करणारा तलाठी प्रवीण सिनगारे अटकेत- राजेंद्र गायकवाड

**आत्ताच एक्सप्रेस**

**अंबड /प्रतिनिधी** / जालना जिल्ह्यातील अंबड व घनसावंगी तालुक्यांत नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांसाठी शासनाने जाहीर केलेल्या अनुदानात मोठ्या प्रमाणावर आर्थिक घोटाळा झाल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणात तब्बल १ कोटी ३० लाख रुपयांचा अपहार** केल्याच्या आर-ोपाखाली तलाठी **प्रवीण भाऊसाहेब सिनगारे (वय ३६, रा. पारा, ता. वाशी, जि. धाराशिव) याला आर्थिक गुन्हे शाखेने अटक केली आहे. या अटकेमुळे संपूर्ण घोटाळ्याच्या तपासाला वेग आला असून प्रशासन व महसूल विभागात मोठी खळबळ उडाली आहे.

नैसर्गिक आपत्तीमुळे पावसाचा लहरीपणा, अतिवृष्टी, दुष्काळ व अन्य कारणांमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. या नुकसानीच्या पार्श्वभूमीवर शासनाने विविध शासन निर्णय (जी.आर.) काढून बाधित शेतकऱ्यांना आर्थिक मदत जाहीर केली होती. मात्र या अनुदानाच्या वितरण प्रक्रियेतच भ्रष्टाचाराने शिरकाव केल्याचे तपासात समोर आले आहे. अंबड व घनसावंगी तालुक्यांमध्ये अनुदानाच्या याद्या ऑनलाईन अपलोड करण्याची जबाबदारी असलेल्या काही अधिकारी व कर्मचाऱ्यांनी संगनमताने बोगस लाभार्थ्यांची नावे याद्यांमध्ये समाविष्ट केल्याचे उघड झाले आहे. केवळ कागदोपत्री शेतकरी दाखवून त्यांच्या नावावर अनुदानाची रक्कम मंजूर करण्यात आली. त्यानंतर ही रक्कम प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत न पोहोचता, परस्पर काढून घेतल्याच्या अनेक तक्रारी प्रशासनाकडे प्राप्त झाल्या होत्या.

या गंभीर तक्रारींची दखल घेत तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांनी सखोल चौकशीसाठी स्वतंत्र चौकशी समिती गठित केली. समितीने केलेल्या तपासणीत धक्कादायक बाबी समोर आल्या. अहवालानुसार जालना जिल्ह्यातील तब्बल २४० गावांमध्ये सुमारे २४ कोटी ९० लाख ७७ हजार ८११ रुपयांचा शासकीय निधीचा अपहार झाल्याचे स्पष्ट झाले. हा अहवाल सादर होताच प्रशासनाने तातडीने कारवाईचे आदेश दिले.




त्यानंतर अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नंबर ४५३/२०२५ अन्वये विविध गंभीर कलमांखाली तसेच आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणाचा तपास जालना पोलीस अधीक्षकांच्या आदेशानुसार आर्थिक गुन्हे शाखा, जालना यांच्याकडे सोपवण्यात आला.

या घोटाळ्याच्या तपासात आतापर्यंत १० आरोपींना अटक करण्यात आली होती. मात्र या प्रकरणातील मुख्य आरोपींपैकी एक असलेला तलाठी प्रवीण सिनगारे गेल्या **चार महिन्यांपासून फरार होता. मोबाईल फोन बंद ठेवणे, सतत ठिकाणे बदलणे अशा क्लृप्त्या वापरून तो पोलिसांना गुंगारा देत होता. अखेर आर्थिक गुन्हे शाखेच्या पथकाने गोपनीय माहितीच्या आधारे धाराशिव जिल्ह्यातून त्याला ताब्यात घेतले.

प्रवीण सिनगारे याच्या अटकेनंतर या प्रकरणात अटक झालेल्या आरोपींची संख्या ११ वर पोहोचली असून अद्याप काही आरोपी फरार आहेत. त्यांचा शोध घेण्यासाठी विशेष पथके तयार करण्यात आली असून तपास अधिक व्यापक केला जात आहे. या घोटाळ्यात आणखी मोठी नावे समोर येण्याची शक्यता पोलिसांकडून व्यक्त केली जात आहे.

ही संपूर्ण कारवाई पोलीस अधीक्षक श्री. अजयकुमार बन्सल , अपर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपाणी व प्रभारी उपअधीक्षक श्री. सिद्धार्थ माने यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. आर्थिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. मिथुन घुगे व त्यांच्या पथकाने अत्यंत नियोजनबद्ध व चिकाटीने तपास करून ही अटक करण्यात यश मिळवले. या प्रकरणामुळे नैसर्गिक आपत्तीच्या काळात शेतकऱ्यांसाठी असलेला निधीही सुरक्षित नसल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. शासन व प्रशासनाने भविष्यात अशा घोटाळ्यांना आळा घालण्यासाठी अधिक कडक नियंत्रण व्यवस्था उभारण्याची गरज व्यक्त होत आहे.

# कृष्णा सवडे आणि भगवान चव्हाण यांचा महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघात जाहीर प्रवेश

**आत्ताच एक्सप्रेस**

**जाफराबाद/ प्रतिनिधी** / महाराष्ट्रातील शिक्षक चळवळ अधिक बळकट होण्याच्या दृष्टीने एक महत्त्वाची घडामोड जाफराबाद तालुक्यात घडली असून, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे जाफराबाद तालुकाध्यक्ष कृष्णा सवडे तसेच समता शिक्षक संघटनेचे प्रमुख नेते भगवान चव्हाण यांनी शनिवार, दिनांक १३ रोजी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघात जाहीर प्रवेश केला.या प्रवेशामुळे तालुका व जिल्हा पातळीवर शिक्षक संघटनांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे.हा जाहीर प्रवेश सोहळा महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष भगवानराव भालके यांच्या कुशल नेतृत्वाखाली तसेच जाफराबाद तालुका अध्यक्ष विनोद पाटील कळंबे यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या सुरुवातीस दोन्ही शिक्षक नेत्यांचे पुष्पगुच्छ देऊन आणि सत्कार करून संघाच्या वतीने जाहीर स्व-ागत करण्यात आले.

याप्रसंगी बोलताना तालुकाध्यक्ष विनोद कळंबे यांनी सांगितले की, संपूर्ण महाराष्ट्रात संघाचे राज्य नेते शेख संभाजीराव थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच राज्याध्यक्ष बाळासाहेब मारणे यांच्या सक्षम नेतृत्वाखाली महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाची घोडदौड सुरू आहे. संघाची सकारात्मक भूमिका, शिक्षकांच्या हक्कांसाठी चालवलेली लढाई आणि संघटनेची शिस्तबद्ध कार्यपद्धती पाहून विविध शिक्षक संघटनांचे पदाधिकारी प्रेरित होत असून मोठ्या संख्येने प्राथमिक शिक्षक संघात प्रवेश करीत आहेत.

जिल्हाध्यक्ष भगवानराव भालके यांनी आपल्या भाषणात सांगितले की, कृष्णा सवडे आणि भगवान चव्हाण हे दोघेही अनुभवी, अभ्यासू आणि शिक्षक प्रश्नांबाबत आक्रमक भूमिका घेणारे नेते आहेत. त्यांच्या प्रवेशामुळे संघाची ताकद निश्चितच वाढणार आहे. संघात प्रवेश घेणाऱ्या या



दोन्ही नेत्यांना त्यांच्या कार्यक्षमतेनुसार योग्य ती जबाबदारी लवकरच देण्यात येईल.यावेळी नव्याने प्रवेश घेतलेल्या कृष्णा सवडे व भगवान चव्हाण यांनीही आपली भूमिका स्पष्ट करत, प्राथमिक शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांसाठी, सेवा हक्कांसाठी आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी संघाच्या माध्यमातून प्रामाणिकपणे काम करण्याचा निर्धार व्यक्त केला.

या प्रवेश सोहळ्यास जिल्हा संपर्कप्रमुख वसंतराव शेवाळे, राज्य नेते रिजवान शेख, पतसंस्थेचे मानस सचिव संजय लोखंडे, सरचिटणीस सतीश राऊत, संपर्कप्रमुख अनंता जंजाळ, कार्याध्यक्ष सुनील पवार, गणेशराव लहाने, धनंजय आढाव यांच्यासह अनेक शिक्षक बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम उत्साही वातावरणात पार पडला असून या प्रवेशामुळे जाफराबाद तालुक्यातील शिक्षक संघटनात्मक कामकाजाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.



# गंगापूर तालुक्यात अवैध गोणखणीज उपसा जोमात महसूल विभागाचे अधिकारी कोमात चर्चेला उधाण

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर /प्रतिनिधी/ सुभान शहा/** गंगापूर तालुक्यातील वरझडी शिवारात अवैध गोणखणी उत्खन्न जोमात अधिकारी कोमात चर्चेला उधाण मागील काही दिवसापासून वरझडी शिवारामध्ये अवैध मुरूमाची उत्खन्न जोमात सुरू आहे. या संदर्भ गावकऱ्यांनी महसूल विभागाकडे तक्रार दाखल केली परंतु महसूल विभागाकडून कोणतीही कारवाई करण्यात आली नसल्याचे बोलले जात आहे. महसूल विभागाचे अधिकारी व गोणखनिज उत्खन्न करणारे माफिया यांची संगतमत असल्यामुळे गायरान जमिनीमधून मोठ्या प्रमाणात मुरूम उत्खन्न केले जात असल्याचे बोलले जात आहे.

गंगापूर तहसीलदार यांच्याकडे लेखी तक्रार करून देखील कारवाई करण्यात आली नसल्याचे आरोप गावकऱ्यांनी केले आहे. अवैध मुरूमाची उत्खन्न वाहतूक करणाऱ्यांना तात्काळ लगाम घाल-ावे मुरूम उत्खन्न तात्काळ थांबवण्यात यावी मुरूम वाहतूक माफियावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी गावकऱ्यांकडून करण्यात येत आहे. कारवाई न झाल्यास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्याचा इशारा संबंधित गावकऱ्यांनी दिला आहे .

महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांच्य आशीर्वादाने अवैध गोणखणीज मोठ्या प्रमाणात उपसा होत असल्याचा आरोप गावकऱ्याकडून करण्यात आला आहे. महसूल विभागाने व जिल्हा प्रशासनाने तात्काळ अवैध गोणखणीज उपसा थांबवावे अशी मागणी जोर धरत आहे.

# केज तालुक्यात लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे जयंती उत्साहात; सामाजिक उपक्रमांचा व्यापक ठसा

**आत्ताच एक्सप्रेस**

**केज (प्रतिनिधी)** बीड जिल्ह्यातील केज तालुक्यात लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे साहेब यांची जयंती विविध सामाजिक, शैक्षणिक व लोकाभिमुख उपक्रमांच्या माध्यमातून मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. तालुक्यातील शाळा, ग्रामपंचायती, वसाहती, सामाजिक संस्था आणि युवक संघटनांनी मुंडे साहेबांच्या विचारांना कृतीची जोड देत रक्तदान, शैक्षणिक साहित्य वाटप, अन्नदान, ब्लँकेट वाटप तसेच स्मृतीस्थळ उभारणीसारखे उपक्रम राबवले.

टाकळी आश्रम शाळेत प्रेरणादायी कार्यक्रम: प्राथमिक निवासी आश्रम शाळा, टाकळी येथे १२ डिसेंबर २०२५ रोजी आयोजित कार्यक्रमात मुंडे साहेबांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली. संस्थेच्या सचिव श्रीमती काशिबाई नारायणराव घुले यांच्या हस्ते हा मान पार पडला. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या मनोगतांतून मुंडे साहेबांचे साधेपण, जनसेवा आणि नेतृत्वगुण अधोरेखित झाले. संस्थेचे उपाध्यक्ष शंकर घुले, मुख्याध्यापक ए.एन. घुले, श्रीकांत घुले यांच्यासह शिक्षकवृंद व कर्मचारी उपस्थित होते.

गोपीनाथगडावर राज्यभरातून अभिवादन: परळी वैजनाथ येथील गोपीनाथगडावर जयंतीनिमित्त अलोट गर्दी उसळली. ना. पंकजाताई मुंडे, डॉ. प्रीतमताई मुंडे, आ. धनंजय मुंडे यांच्यासह मुंडे परिवाराने समाधीचे दर्शन घेतले. 'वंचित-पीडितांसाठीच गोपीनाथगडाची निर्मिती' असल्याचे सांगत ना. पंकजाताई यांनी मुंडे साहेबांच्या लोकसेवेचा आदर्श पुढे नेण्याचा निर्धार व्यक्त केला. रक्तदान शिबिरे, अन्नदान, गरजूंना मदत, भजन सेवा अशा विविध उपक्रमांनी परिसर भारावून गेला.

गप्पेवाडी-नामेवाडी येथे अनोखा उपक्रम: गप्पेवाडी-नामेवाडी येथे सरपंच बाळासाहेब केदार यांच्या पुढाकारातून ऊसतोड कामगारांच्या मुलांना शालेय गणवेश, टिफिन बॅग व खाऊ वाटप करून जयंती साजरी करण्यात आली. विद्यार्थ्यांनी मुंडे साहेबांच्या जीवनकार्यावर भाषणे केली. पंचक्रोशीतील ग्रामस्थ, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

केज शिक्षक कॉलनीत 'लोकनेते गोपीनाथराव मुंडे चौक': केज येथील शिक्षक कॉलनी, बीड रोड येथे मुंडे साहेबांच्या नावाने चौकाचे लोकार्पण करण्यात आले. स्थानिक युवक व कार्यकर्त्यांच्या पुढाकारातून हा उपक्रम यशस्वी ठरला. या चौकामुळे मुंडे साहेबांच्या स्मृतीला कायमस्वरूपी उजाळा मिळेल, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.रक्तदानातून सामाजिक बांधिलकी: जीवन विकास शिक्षण मंडळ, केज यांच्या वतीने स्वामी विवेकानंद विद्यामंदिर येथे ७६ व्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. ४२ रक्तदात्यांनी सहभाग नोंदवला. गेली तीन दशके अखंड सुरू असलेली ही परंपरा समाजोपयोगी ठरत असल्याचे मान्यवरांनी नमूद केले.

येवता येथे रक्तदान व शैक्षणिक साहित्य वाटप: येवता येथे आयोजित रक्तदान शिबिर व शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रमात डॉ. प्रीतमताई मुंडे यांनी विष्णू घुले यांच्या समाजकार्याचे कौतुक केले.



युवकांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग लाभला. शिक्षण व आरोग्याच्या माध्यमातून शेवटच्या घटकापर्यंत न्याय पोहोचवण्याचा संदेश यानिमित्ताने देण्यात आला.केज तालुक्यात विविध ठिकाणी साजरी झालेली लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे यांची जयंती ही केवळ स्मरणदिन न राहता 'सेवेला कृतीची जोड' देणारा व्यापक सामाजिक उपक्रम ठरली.

रक्तदान, शिक्षण, मदतकार्य आणि स्मृतीस्थळांच्या माध्यमातून मुंडे साहेबांचा लोकाभिमुख वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न सर्वत्र दिसून आला.

# रक्तदान करून प्रवीण भाई तोगडिया यांचा वाढदिवस साजरा

### ३१ रक्तदाता कडून रक्तदान



**आत्ताच एक्सप्रेस**

**जाफ्राबाद /प्रतिनिधी**/जाफ्राबाद तालुक्यातील टेंभुर्णी येथील दत्त मंदिर परिसरात आंतरराष्ट्रीय हिन्दू परिषद व राष्ट्रीय बजरंग दलाचे संस्थापक अध्यक्ष श्री प्रवीणभाई तोगडिया यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबीर संपन्न.या कार्यक्रमासाठी आंतराष्ट्रीय हिन्दू परिषद व राष्ट्रीय बजरंगदलाचे संघटन मंत्री विकासजी रेंगे गोवा/महाराष्ट्र राज्याचे क्षेत्रीय मंत्री किशोरजी डिकोडियार देवगिरी प्रातं उपाध्यक्ष श्री अविनाश देशमाने जालना जिल्हा संपर्क मंत्री जगन्नाथ शिंदे यांची उपस्तीथी होती.या मध्ये विलास धनवाई, सचिन काळे, प्रकाश इंगळे, शाम आवटी,भागाजी सोनसाळे, अनिल भाले,ज्ञानेश्वर ढवळे, पवन उखर्डे, अनिकेत उखर्डे, दादाराव देशमुख, योगेश गडकर, राजु केवट, सागर इंगळे, संतोष उगले, कैलास जाधव, राहुल शेडुदे, कृष्णा आहेर, उमेश गावंडे, अनिकेत जमधडे, सूर्यभान मतकर, मंगेश वाणी, सदाशिव म्हस्के, विनोद इंगळे, अविनाश देशमाने आदि ३१ रक्त दात्यानी रक्तदान केले.कार्यक्रमासाठी शैलेश डोमळे, भारत बोराडे, सागर इंगळे, श्रीकांत उखर्डे, अक्षय गावंडे, कृष्णा आहेर, राजु भागवत, अनिकेत जमधडे, विष्णु उखर्डे, आकाश बोराडे, पवन उखर्डे, अनिकेत उखर्डे, शेखर आहेर, आदि कार्यकर्ते उपस्तिथ होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट ॲण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813